वर्ष तेरावे : अंक १० : ऑक्टोबर २०२४




**जागतिक कर्णबधिरत्व दिन जनजागृति फेरी**

# कॉक्लिआ वार्ता

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE
कॉक्लिआ पुणे
श्रवण आणि वाचा विकासासाठी
FOR HEARING & SPEECH

◆ 1998 ◆

# COCHLEA WARTA

**जागतिक कर्णबधिरत्व दिन जनजागृति – पथनाट्य**




Volume Thirteen : Issue 10 : OCTOBER 2024 Total Pages : 16 Rs. 10/-



गोवा केंद्र


कुडाळ केंद्र



# गणपती उत्सव


पिंपरी केंद्र


मंचर केंद्र




कुडाळ केंद्र



नारायणगाव केंद्र

# शिक्षक दिन

**COCHLEA WARTA** **कॉक्लिआ वार्ता**

**वर्ष : १३ वे | अंक : १०**

**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट

**मुद्रण :**
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट :**
सौ. मानसी दाते

## अंतरंग

**Editorial** ... ०२
Mrs. Manasee Date

**लवकर निदान, तत्पर उपचारांमुळे ऐकून बोलण्याचा सुखकर प्रवास...** ... ०३
– सौ. सीमा ठोंबरे

**खडतर प्रवासाचा सुखांत..!** ... ०५
– मिरा भांगे

**दौंडचे स्नेहसंमेलन** ... ०७
– सुप्रिया किरवे

**Event** ... ०९
– मृदुल बापट

**Success Story of our Child...** ... १३
– ज्योती रानपुरा

| | | |
|---|---|---|
| **Printed & Published by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Owned by** | : | Cochlea Pune for Hearing and Speech |
| **Printed by** | : | Sanjeev V. Shinde<br>Paud Road, Kothrud, Pune. |
| **Published at** | : | Cochlea Pune for Hearing and Speech<br>161-A, Modibaug, Shivsagar Society,<br>Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016. |
| **Editor** | : | Dr. Avinash Madhav Wachasundar |

# EDITORIAL

- Mrs. Manasee Date

This issue brings to you one writeup by a teacher and one by a mother, giving facts about hearing impaired children. One of them is a premature baby and was in NICU for a month. After going home, again due to some problems, he was again admitted in NICU. After that he was ok, but development was very slow. When he was two years old they realised that he is not responding to sounds and after many hurdles came to know about Cochlea and hence landed in "Pusalkar Swaranaad". Once in Swaranaad there is no looking back and he is progressing day by day and their relatives and friends are astounded at the development.

World Deaf day was celebrated in Swaranaad by organising many events. On 28th September 2024, a procession of 120 people, consisting of hearing impaired children, their parents, teachers and passed students attracted people all the way from "Sambhaji Park" to "Kalakaar Katta". All the events were focused on spreading awareness about hearing impairedness. The parents performed street play at three places during the procession. Flyers regarding what to do when one comes across hearing impaired baby were distributed. Children were holding banners displaying information as well as misconceptions about hearing impairedness. The procession was very well supported by police from Deccan Police Station.

Some of the participants of "Rickshaw Rally", December 2019, visited Pusalkar Swaranaad on 1st October 2024. As usual our children had a great time with all of them. The participants interacted with the teachers, parents and staff also. They were satisfied and happy that their contribution was worth it.

We all from Cochlea again thank all the Sewa UK team for bringing our dream in to reality.

◆◆◆

## लवकर निदान, तत्पर उपचारांमुळे ऐकून बोलण्याचा सुखकर प्रवास...

मी सीमा ठोंबरे एक विशेष शिक्षिका म्हणून काम करते. आज मी तुम्हाला अहमदनगरमध्ये राहणाऱ्या शिवराज वाबळे या मुलाविषयी थोडेसे सांगणार आहे. शिवराज हा १ वर्षाचा असताना त्याच्या आई-वडिलांच्या लक्षात आले की, त्याला ऐकू येत नाही. म्हणून त्यांनी डॉक्टरांकडे जाऊन त्याची कानाची तपासणी म्हणजे बेरा टेस्ट केली तेंव्हा त्यांना कळाले की त्याला १०० टक्के लॉस आहे. हे सत्य कळाल्यानंतर त्यांच्या पायाखालची जमिनच सरकली. कारण दोन्हीकडच्या कुटुंबात ऐकू न येणारे हे पहिलेच मूल होते. त्यांना हे खरंच वाटत नव्हत की, शिवराजला ऐकू येत नाही. म्हणून त्यांनी पुन्हा एकदा पुण्याच्या के ई एम हॉस्पिटलमध्ये टेस्ट केली. तेथेही त्याला १०० टक्के लॉस आहे हेच सांगण्यात आले. त्यांनी शिवराजला हिअरिंग एड लावण्यास सांगितले व त्यांनी लगेच त्याला हिअरिंग एड लावून त्याची स्पीच थेरपी सुरू केली. पण हिअरिंग एड चा त्याला काहीच फायदा होत नाही हे पाहून त्यांनी घरच्यांचा विरोध पत्करून इंप्लान्ट करण्याचा निर्णय घेतला आणि ३ महिन्याने त्याचे इंप्लान्ट झाले.

२५ डिसेंबर २०२२ रोजी त्याचे इंप्लान्ट झाले आणि २४ जानेवारी २०२३ मध्ये त्याचे स्वीच ऑन झाले आणि लगेच त्याची स्पीच थेरपी सुरू झाली. आठवड्यातून दोनदा त्याची थेरपी व्हायची. सुरूवातीला तो थेरपीला बसत नव्हता आणि थेरपीमध्ये शिकवलेले घरी घेणे त्याच्या आईला जमत नव्हते. ३-४ महिने झाले असेच व्हायचे आणि अशातच एक दिवस ते मॅपिंगला गेले नसताना त्यांना आपल्या पुसाळकर स्वरनाद उरवडे या शाळेची माहिती मिळाली. अधिक वेळ न घालवता लगेच त्यांनी कविता खरे मॅडम (मुख्याध्यापिका) यांना फोन करून शाळेची सर्व माहिती मिळवली आणि ते शाळा बघण्यास आले. त्यावेळेस शाळेला मे महिन्याच्या सुट्ट्या लागणार होत्या. त्यामुळे जूनमध्ये अॅडमिशन घ्या असे त्यांना सुचवण्यात आले.

या दरम्यान लक्षात आले की त्याचे वय लहान आहे. तो अडीच वर्षांचादेखील नाही, तो वर्गात बसणार नाही. तेव्हा त्याला आपण ऑनलाईन स्पीच थेरपी देऊ असे सांगितले. त्याची ऑनलाईन स्पीच थेरपी सुरू झाली. काही दिवसातच त्याच्या आईच्या लक्षात आले की आपल्याला त्याला घरी हवा तितका वेळ देताच येत नाही. मग त्या रक्षा देशपांडे मॅडमशी बोलल्या व त्यांची अडचण सांगितली तेव्हा मॅडमने त्यांना उरवडे शाळेत राहण्यासाठी परवानगी दिली.

१५ ऑगस्ट २०२३ रोजी शिवराज आणि त्याची आई पुसाळकर स्वरनाद उरवडे येथे राहण्यास आले. येथे येऊन १ महिना पूर्ण झाल्यावर लक्षात आले की, तो आवाजच घेत नाही. आय कॉन्टॅक्ट देत नाही हे पाहून त्याला वन-टू-वन स्पीच थेरपी सुरू केली. सुरूवातीला तो फक्त 'आ' एवढाच उच्चर काढायचा त्याची मॅपिंग करून घेतल्यानंतर त्याने आवाजाला खूप छान प्रतिसाद द्यायला सुरूवात केली. त्याचा आय कॉन्टॅक्ट देखील वाढू लागला. आता तो खूप छान सिक्स साउंड ऐकतो. उच्चार

काढतो. एक–एक शब्द उच्चारतो आता शिवराजला उरवडेला येऊन ४ महिने पूर्ण झाले. त्याची प्रगती खूप छान होत आहे. तो आता सगळे आवाज ऐकतो. आवाजाची दिशा ओळखतो आय कॉन्टॅक्ट देतो. स्वतःचे नाव ऐकून मी असा प्रतिसाद देतो. आवाज ऐकून प्राणी, पक्षी, वाहने ओळखतो तसाच आवाज काढण्याचा प्रयत्न करतो. नावे ऐकून फळे, प्राणी, पक्षी ओळखतो. शब्द ओळख जरा कमी आहे पण चित्र ओळख छान झाली आहे.

हातात पेन्सिल न धरता येणारा शिवराज आता चित्र–चित्र जोड्या लावतो. चित्र रंगवतो, ऐकून अक्षरांना, चित्रांना गोल करतो, गाण्यांची नक्कल करतो. शब्द उच्चारण्याचा प्रयत्न करतो. आता तो मावशी हा शब्द उच्चारण्यास शिकला आहे. सगळ्यांना माशी... माशी.. असा आवाज देतो. सर्व मुलांमध्ये मिसळतो. खेळतो स्वतःच्या हाताने जेवण करतो. सगळ्या भाज्या खातो, तो स्वतःचे ताट उचलून ठेवतो. मस्ती करतो, तो खूप चंचल आहे. त्याची प्रगती पाहून मला (सर्वांना) खूप आनंद होतो. त्याच्या घरच्यांनाही खूप आनंद होतो आहे. उरवडेला येऊन राहण्याचा त्यांचा निर्णय किती योग्य होता हे त्यांना कळाले आहे.

शिक्षिकांबरोबरच त्याच्या आईची ही खूप मेहनत आहे त्याची आई सांगेल त्याप्रमाणे त्याचा अभ्यास घेते. असा आमचा शिवराज याची अशीच खूप छान प्रगती होवो हीच आमची सर्वांची इच्छा.

योग्य वयात योग्य शिक्षण मिळाले की मुलाची प्रगती खूप छान होते.

**सीमा ठोंबरे**
विशेष शिक्षिका, पुसाळकर स्वरनाद, उरवडे.

◆◆◆

**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

---

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | 'Cochlea Pune for Hearing and Speech' |
| Account No. | : | 60040230428 |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune. |
| IFSC Code | : | MAHB0000043 |

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

## खडतर प्रवासाचा सुखांत..!

नमस्कार,

आधी मी मनापासून पुणे कॉक्लिआ स्वरनादचे आभार मानते.

मी मिरा दिपक भांगे, शिवाय दिपक भांगे हा माझा मुलगा आहे आणि आता तो ३ वर्षांचा झाला आहे. जेव्हा तो जन्माला आला तेव्हापासूनच आम्हाला खुप मोठ्या प्रसंगाला सामोरे जावे लागले आहे. तो आठव्या महिन्यात जन्मल्यामुळे त्याला महिनाभर एन आय सी यू मध्ये ठेवले होते. काही दिवसातच तो खुप आजारी पडल्यामुळे त्याला परत एन आय सी यू मध्ये ठेवले होते. तेव्हा डॉक्टरांनी त्याची गॅरंटी दिली नव्हती म्हणून आम्ही खुप घाबरलो होते. शेवटी त्याला व्हेंटिलेटर वरती ठेवण्यात आले. आमच्यासाठी सगळेच मार्ग बंद झाले असे वाटत होते पण देव तारी त्याला कोण मारी... याप्रमाणे त्यांला एका आठवड्यात बरं वाटू लागले.

त्यानंतर डॉक्टरांनी त्याच्या सगळ्या तपासण्या केल्या. त्यात ओ ए ई मध्ये रेफर म्हणून आले. पण डॉक्टरांचे म्हणणे होते की, कधी-कधी कानात पाणी असल्यामुळे असे होते. त्यानंतर आम्ही इकडचे वातावरण थंड असल्यामुळे गावी घेऊन गेलो. त्याला गावाकडचे वातावरण चांगले सुट झाले. पण लवकर जन्मल्यामुळे त्याच्या सगळ्या क्रिया उशीरा झाल्या. एक वर्षांचा झाल्यावर तो पालथा पडून सरकू लागला. आमच्याबरोबर चांगला खेळू लागला. आम्ही बोलल्यावर तो हासू लागला. भांड्यांचा मोठा आवाज झाला किंवा गाडीचा हॉर्न वाजला की इकडे-तिकडे बघू लागला. त्यामुळे आम्हाला वाटलं की त्याला ऐकू येतं. कानाचा काही प्रॉब्लेम नाही. पण तो काही बोलत नव्हता. आमच्या घरच्या माणसांचं म्हणणे आले की काही मुले कधी-कधी उशीरा बोलतात. त्याचे काका पण उशीराच बोलले. म्हणून आम्ही त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.

एकदिवस पौडमध्ये लहान मुलांचे शिबीर झाले होते. त्यावेळी शिवायच्या तपासणीसाठी आम्हीपण गेलो. तेव्हा आम्हांला कळाले की त्याला ऐकू येत नाही. तेव्हा तर आमच्या पायाखालची जमिनच सरकली. नंतर डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे सिंबॉयसीस मध्ये त्याची B E R A टेस्ट केली. तेव्हा कळाले की त्याच्या एका कानाला ८० टक्के आणि दुसऱ्या कानाला ९० टक्के हिअरिंग लॉस होता. आम्ही खूप काळजीत पडलो. आम्हांला खूप टेन्शन आले, मग नातेवाईकांच्या आणि मित्रांच्या सांगण्यानुसार आणखी दोन-तीन डॉक्टरांना दाखले पण त्यांचे पण हेच उत्तर आले. मग KEM ला गेल्यावर आम्हांला कानाचा एम आर आय करायला सांगितले व त्यात कळाले की, त्याचा

कॉक्लिआ अर्धवट असल्यामुळे त्याला ऐकायला येत नाही. अर्धवट कॉक्लिआ असल्यामुळे डॉक्टरांनी सांगितले की त्याचे इम्प्लांट होणार नाही. मगतर आम्ही पूर्णपणे खचून गेलो. आमच्या गावाकडे कर्णबधिरची संस्था होती. आमचे नातेवाईकांचे होते. त्यांनी आम्हांला पॉकेट मॉडेल वापरायला सांगितले. जवळ–जवळ सहा महिने आम्ही त्यांच्याकडे जात होतो. पण शिवायमध्ये काहीच फरक पडत नव्हता जस–जसे दिवस जात होते, तस–तसे आमची काळजी, टेन्शन वाढत होते.

मग आम्हांला पौडला आल्यावर कळाले की, उरवडेला कॉक्लिआ स्वरनादची लहान मुलांची शाळा आहे. तिथे मुलांना ऐकायला, बोलायला शिकवले जाते. मग कविता मॅडमचा नंबर आम्हालां मिळाला. त्यांच्याशी कॉन्टॅक्ट करून आम्ही शाळा पाहिली, मुलांना भेटलो खुप छान वाटले. एक नवीन उमेद आली. १७ जून पासून शाळा सुरु होणार होती. कविता मॅडमने आम्हाला सांगितले की घोटावडे फाट्यापासून शाळेची गाडी आहे. त्यामुळे येण्या–जाण्याचा आमचा खूप मोठा प्रश्न मिटला.

१७ जूनला शाळा चालू झाली. महिन्याभरातच शिवायमध्ये प्रगती दिसून येऊ लागली. मग तर आम्हाला खूप हुरूप आला. दुसऱ्या महिन्यातच शिवाय बोबडे–बोबडे बोल बडबडू लागला. १ ते ५ अंक बोलू लागला. तिसऱ्या महिन्यात ते 'अ' ते 'अः' पर्यंत सगळे बोलू लागला. फळे, प्राणी, पक्षी, घरातील वस्तू ओळखू लागला. प्राण्याचे आवाज काढू लागला. आतातर नवलंच वाटू लागले. १ ते ३ पर्यंत वाकडे तिकडे का होईना अंक लिहू लागला आहे.

आता आम्हाला स्वरनाद ने नविन बी टी ई ची मशिन देऊ केली आहे. त्यामुळे तो आणखी आवाज घेऊ लागला आहे. एक–एक वाक्य आमच्या मागे बोलू लागला आहे. स्वतःच्या हाताने जेवण करु लागला आहे. शब्द, अक्षर, अंक यांच्या जोड्या खूप छान पद्धतीने लावू लागला आहे. हे सगळं पाहून आमचं आणि घरच्यांच मन भारावून जातं. अशीच दिवसें–दिवस त्याची प्रगती होत चालली आहे. त्याची होत असलेली प्रगती पाहून मनाला खूप समाधान वाटतं. जर आम्हाला कॉक्लिआ स्वरनाद, पुणे ची शाळा माहिती नसती तर, शिवायची एवढी प्रगती झालीच नसती. त्यामुळे आम्ही कॉक्लिआ स्वरनाद या शाळेचे खूप आभारी आहोत. आम्हाला जगण्याची नवीन उमेद दिल्या बद्दल......

**मिरा दिपक भांगे**
पालक, स्वरनाद, कोथरूड.

◆◆◆

## दौंडचे स्नेहसंमेलन...

गॅदरिंग.... स्नेहसंमेलन म्हटले की कसे वेगळे छान... भारी... वाटतं.

आम्ही शिक्षिका, आमचा संबंध कायम काळ्या-पांढऱ्या रंगाशी आणि हो यामध्ये एकरूप होताना आनंद ही वाटतो.

पण स्नेहसंमेलन आमच्या आयुष्यात पूर्ण वर्षातील त्या एका दिवसात अनेक रंग घेऊन येतं.

प्रत्येक मुलांमधील छटा, राग, कला कोणाचे प्रेम, कोणाचे समजून घेणे समजायला लागते. तसेच मुलांचे सामाजिकीकरण वाढायला लागते.

आमचे स्नेहसंमेलन आले. गाणे, डान्स बसवले, नाटुकले बसवले आणि हो आमच्यासाठी महत्त्वाचे म्हणजे मुलांचे speech घेतले. 'बोलता न येणारी मुले खूप छान आत्मविश्वासाने मध्ये स्टेजवर जाऊन बोलू लागली.' नाचताना पुढे उभ्या आई-बाबा तसेच ताईशी एकरूप होऊन छान नाचली. स्नेहसंमेलन छानच झाले.

पण स्नेहसंमेलनातील कार्यक्रम छान होण्यामागचे कारण तर सांगायलाच हवे ना... यासाठी न थकता कोणाच्याही टीकेला वाव न देता पुढे ढाल बनून उभे असलेले पालक हेच हे कार्यक्रम छान होण्याचे कारण...

या पालकांनी देखील आपल्याला येणाऱ्या अडचणी व त्यावर ते कसे पुढे गेले हे सांगायला 'भारूड' सादर केले. अस्सल गावठी अंदाज दाखवत त्यांनी या भारूडात सर्व special मुलांना येणाऱ्या आडचणी व त्यावरील योग्य उपाय देखील सांगितले.

कार्यक्रमात उभारणी खुप महत्त्वाची असते. आम्ही इथे दौंडमध्ये थांबून प्रत्यक्षात काम करत असलो तरी आमच्या सोबत कायम काही व्यक्ती न थकता पूर्ण वेळ काम करत होत्या. त्यामध्ये आमच्या सोबत खुप सुंदर काम करणाऱ्या निशा मॅडम, आमच्या माजी मुख्याध्यापिका अभिलाषा मॅडम तसेच आमची प्रेरणास्थाने रक्षा मॅडम व वाचासुंदर सर यांचे खरंच खुप खुप आभार...!

कार्यक्रमात येणारे पाहुणे, हे सर्व बघून खुप कौतुक करत होते. त्यांनी आता कायम आपल्या सोबत राहणार हे अश्वासन देखील दिले.

या स्नेहसंमेलनात आणखी दोन महत्त्वाचे कार्यक्रम झाले. एक म्हणजे आपल्या सेंटरमध्ये ३ वर्ष शिकून पूर्णपणे सर्वसामान्य शाळेत जायला तयार असणाऱ्या मुलांचा ग्रॅज्युएशन सेरेमनी व दुसरा म्हणजे पालक प्रशिक्षण प्रशिस्तीपत्रक वाटत समारंभ.

ग्रॅज्युएशन सेरेमनी करताना वाईट तर फार वाटले. आपली मुले लांब जाणार पण त्याहून खुप जास्त अभिमानही वाटला. कारण आपली स्पेशल मुले आता सर्वसामान्य शाळेत जाऊन सर्वसामान्य आयुष्य जगणार.. खुप छान वाटतंय त्यांनी कायम अशीच प्रगती करावी ही इच्छा...

'पालक प्रशिक्षण' पूर्ण केलेले पालक आता नविन रूपात म्हणजेच आमचे 'सहशिक्षक' बनुन आम्हाला मदत करणार. हे प्रशिक्षण मुलांच्या प्रगतीत भर पाडण्यासाठी खुप उपयुक्त आहे.

स्नेहसंमेलनानंतर प्रत्येक मुलांमधले गुण–कौशल्य समोर आले. त्यांचा आत्मविश्वास खुप वाढला आणि त्याचबरोबर आमचे स्वरनादचे स्वप्न 'होय, प्रत्येक कर्णबधीर मुल बोलेलच...' तर पूर्ण झालेच पण त्याचबरोबर प्रत्येक क्षेत्रात खुप छान कामगिरी करेल हा आत्मविश्वास पण वाढला...

**सुप्रिया किरवे**
विशेष शिक्षिका, स्वरनाद, दौंड

◆◆◆

## आंतरराष्ट्रीय कर्णबधिरत्व सप्ताह

२३ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर २०२४

**जनजागृतीसाठी दिलेल्या भेटी :**

जागतीक कर्णबधिरत्व दिनानिमित्त सप्टेंबर महिन्यातील शेवटच्या आठवड्यात सावंतवाडी व कुडाळ तालुक्यातील ई एन टी डॉक्टर्स, बालरोगतज्ज्ञ व होमिओपॅथी डॉक्टर यांना भेटी दिल्या व आपल्या संस्थेबद्दल माहिती दिली. तसेच क्लिनिकमध्ये आलेल्या सर्व पेशंट (पालकांना) आपल्या संस्थेची पॅम्प्लेटस वाटण्यात आली. कुडाळ तालुक्यातील अंगणवाडी (Private) भेट दिली व तेथील शिक्षक व पालकांना माहिती दिली.

**सावंतवाडी तालुका :**

१. डॉ. मिलिंद खानोलकर – बालरोगतज्ज्ञ
संजिवनी बालरूग्णालय

२. डॉ. दत्तात्रय सावंत – बालरोगतज्ज्ञ
साटम महाराज बालरुग्णालय

३. डॉ. लिना परूळेकर – ई.एन.टी डॉक्टर
आनंद पॉलिक्लिनिक

**वाय. सी. एम. सेंटर :**

कर्णबधिर दिनानिमित्त आम्ही वाय. सी. एम. हॉस्पिटलमधील लहान मुलांची तपासणी जिथे होती, तिथे आपली पॅम्प्लेट्स भिंतीवर चिकटवून आलो.

हॉस्पिटलमध्ये लहान मुले जिथे ॲडमिट असतात, तिथे जाऊन एन.आय. सी.यु. विभागात जाऊन तिथल्या नर्सना व लहान मुलांच्या पालकांना भेटुन कर्णबधिरत्व या अपंगाविषयी माहिती दिली व माहिती पत्रके दिली.

हॉस्पिटलमध्ये गुरूवारी लसीकरण होते. त्या विभागात तिथल्या बालकांच्या पालकांना पॅम्प्लेट्स वाटले व लहान मुलांच्या डॉक्टरांची भेट घेऊन त्यांनाही पॅम्प्लेट्स दिली.

वाय.सी.एम. सेंटरमधील दोन पालकांचे प्रबोधन करणारे व्हिडीओ तयार करून ते सोशल मिडीयावर टाकले.

**कुडाळ तालुका :**

१. डॉ. मिलिंद खानोलकर – बालरोगतज्ज्ञ
संजिवनी बालरूग्णालय

२. डॉ. मधुकर सवदत्ती – एम.बी.बी.एस.

३. सावंतवाडी संस्थान मराठा समाज भगिनी मंडळ संचलित बालवाडी
– शिक्षिका भक्ती सावंत

४. डॉ.संदिप पाटील–स्वामी समर्थ क्लिनिक

# EVENTS

## शिक्षक दिन

संस्थेच्या विविध केंद्रांमध्ये सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. मोठ्या वर्गात शिकणाऱ्या मुलांनी लहान वर्गात शिकणाऱ्या मुलांना हातात खडू आणि पेन्सिल घेऊन शिकविले. या मुलांनी अगदी आपल्या शिक्षकांप्रमाणे लहान मुलांना शिकविताना शब्दचिट्ठी, वाक्यपट्टी तसेच चित्रांचा वापर केला. प्रत्येक मुलाने वेगवेगळे विषय घेतले होते कोणी फळे, वाहने, रंग, आकार हे विषय घेतले तर कोणी श्लोकसुद्धा शिकविले. सर्व मुलांनी खरोखर अद्‌भुतरित्या शिक्षक दिन साजरा केला.

## शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांची निसर्ग सहल – गप्पांगण, पुणे

शिक्षक दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या सर्व केंद्रातील विशेष शिक्षकांची गप्पांगण, पुणे येथे अभ्यास सहल नेण्यात आली होती. तेथील विविध प्रकारची आयुर्वेदिक झाडे, फुले पाहून सर्व शिक्षिका हरखून गेल्या होत्या. तेथील एका सभागृहात शिक्षकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता. त्यात सर्वच शिक्षकांनी हिरीरीने सहभाग घेतला होता. नृत्य, संगीत, नाटक तसेच वाद्य वादन सर्वच प्रकार शिक्षकांनी सादर केले. यावेळी संस्थेच्या एक ज्येष्ठ विशेष शिक्षिका वर्षा वैद्य या निवृत्त होणार म्हणून त्यांचा सन्मान करण्यात आला.

## गणेशोत्सव

संस्थेच्या सर्वच केंद्रांमध्ये गणेशोत्सव दिमाखात साजरा झाला. प्रत्येक केंद्रात विविध पद्धतीने उत्सव साजरा करण्यात आला. गणपतीच्या मूर्ती बनवणे, गणपतीचे चित्र रंगवणे, क्ले च्या माध्यमाचा वापर करून गणपतीची मूर्ती बनवणे, गणपतीच्या गाण्यावर नृत्य सादर करणे अशा विविध पद्धतीने गणेशोत्सव साजरा झाला.

## जागतिक कर्णबधिर दिन, स्वरनाद कोथरूड केंद्र :

### पोस्टर बनवणे स्पर्धा –

जागतिक कर्णबधिर दिनानिमित्त या केंद्रातील पालकांसाठी दिनांक २४ सप्टेंबर रोजी पोस्टर बनवणे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ९ गटांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे होते –

- **स्क्रीन ॲडिक्शन**
- **लवकर निदान, लवकर उपचार**
- **बोला मी ऐकतोय !**
- **Deafness is not the End.**

प्रत्येक गटाने वेगवेगळ्या पद्धतीने आणि अतिशय कल्पकतेने पोस्टर तयार केले आहेत. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सौ. पूर्वा जोशी, रुईया मुकबधिर शाळेच्या सामाजिक कार्यकर्त्या यांना आमंत्रित केले होते. परीक्षकांनी देखील पालकांचे खूप कौतुक केले. या स्पर्धेतील यशस्वी पालकांना पुढील पालक सप्ताहमध्ये पारितोषिक देण्यात येणार आहे.

### निबंध स्पर्धा

पालकांसाठी दिनांक २५ सप्टेंबर रोजी निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये १२ पालकांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये एक बाबा पालक देखील आहेत. निबंध स्पर्धेचे विषय खालील प्रमाणे होते.

- **मी स्वरनादमध्ये आले नसते तर..**
- **विशेष मूल घडवताना आलेली आव्हाने व त्यावर केलेली मात**
- **कर्णबधिर मुलांच्या शैक्षणिक विकासामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्त्व**
- **माझ्या कर्णबधिर बालकाबाबत माझे स्वप्न व माझे प्रयत्न**
- **स्क्रीन ॲडिक्शन**
- **माझे कर्णबधिर मूल, मी आणि निवांत वेळ**

## जनजागृती पथफेरी–संभाजी उद्यान ते डेक्कन येथील कलाकार कट्टा

दिनांक २८ सप्टेंबर, २०२४ रेजी संभाजी उद्यान ते डेक्कन येथील कलाकार कट्टा या ठिकाणी कर्णबधिरत्वाविषयी जनजागृती फेरी (रॅली) आयोजित करण्यात आली होती. फेरीमध्ये कर्णबधिरत्व म्हणजे काय, कर्णबधिरत्वा विषयी असणारे समज–गैरसमज, कर्णबधिरत्व कसे टाळावे असे फलक घेऊन घोषणा दिल्या, पालकांनी पथनाट्य सादर केले आणि माजी विद्यार्थी व शिक्षकांनी माहिती पत्रके वाटली.

जनजागृती फेरीमध्ये संस्थेतील कर्णबधिर मुले, पालक माजी विद्यार्थी, शिक्षिका व कर्मचारी असे १२० जण सहभागी होते. शिक्षिका व पालकांनी पुढाकार घेत समाजात कर्णबधिर बालकांना समावेशित करून घेण्याचेही आवाहन केले. यावेळी डेक्कन पोलिस स्टेशन, पुणे यांनी अतिशय मोलाची मदत केली.

**मृदुल बापट**
समुपदेशक आणि समाजकार्यकर्ती
स्वरनाद, कोथरूड

◆◆◆



# कॉक्लिआ ने निकाली जागरुकता रैली

भास्कर न्यूज | पुणे

## बहरेपन से जुड़ी भ्रांतियों को किया दूर

कोथरुड की कॉक्लिआ संस्था और पुणे मनपा द्वारा संचालित बहरापन बच्चों के पुनर्वास केंद्र ने संयुक्त रूप से विश्व बहरापन दिवस के अवसर पर विभिन्न गतिविधियों का आयोजन किया। इसके तहत शनिवार को डेक्कन में संभाजी उद्यान से कलाकार कट्टा तक बहरेपन के बारे में जागरूकता रैली निकाली गई। इस रैली में बच्चे, उनके माता-पिता और कर्मचारी शामिल थे। जागरुकता रैली में बहरापन क्या है, बहरेपन के बारे में भ्रांतियां आदि के बारे में बताया गया।

सभी सरकारी अस्पतालों में जांच की सुविधा नहीं

चूंकि ये बच्चे सुन नहीं सकते, इस वजह से वह बोल भी नहीं सकते, इसलिए आगे की जिंदगी में इन्हें काफी दिक्कतों का सामना करना पड़ता है। सभी बच्चों के जन्म के बाद, यह निर्धारित करने के लिए बेरा नामक एक परीक्षण किया जाता है कि कौन सा बच्चा बहरा है। लेकिन यह जांच सभी सरकारी अस्पतालों में उपलब्ध नहीं होने के कारण ऐसे बच्चों की बीमारी का पता नहीं चल पाता है। यदि इस उम्र में उनका बहरापन उजागर नहीं हुआ तो उसे जीवन भर ऐसे ही रहना पड़ेगा।

दैनिक भास्कर Sun, 29 September https://epaper.bha






## ICMR प्रोजेक्टच्या अंतर्गत
## 'कॉक्लिआ पुणे फॉर हिअरींग ॲण्ड स्पिच'

**होय! प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल..**

# वार्षिक स्नेहसंमेलन २०२४-२५

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी पुनर्वसन व सर्वांगीण विकास केंद्र, दौंड**

रविवार, २९ सप्टेंबर २०२४, सकाळी ११ वाजता
स्थळ : योगराज मंगल कार्यालय, अहमदनगर–दौंड रोड, सोनवाडी, दौंड, पुणे

**प्रमुख उपस्थिती :**

**श्री. नंदुशेठ काळभोर सर, सामाजिक कार्यकर्ते**

आपल्या स्नेहसंमेलनाचे कौतुक केले. आपल्या चांगल्या चालणाऱ्या कार्यासाठी शुभेच्छा देवून पुढील कार्यासाठी लागणारी योग्य ती मदत, सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

**श्री. अभिषेक राजेंद्र दंडनाईक, नी.टी.संकल्प फाउंडेशनचे संचालक –**

अशा प्रकारचे कार्य करणारी संस्था कुठेही पाहिली नाही. आपले कार्य अत्यंत कठीण तसेच महान आहे. संस्थेच्या कार्याचे कौतुक करुन पुढच्या मदतीचे आश्वासन दिले.

**श्री. किरण बाळासाहेब कुरुमकर, अध्यक्ष,युवा सेना, श्रीगोंदा तालुका**

यांनी मुलांच्या ऑपरेशनसाठी मदत केली. परंतु पुढील कार्य किती महान, अवघड आहे, असे मत मांडले. संस्थेच्या कार्याचे कौतुक केले, शिक्षिकांचे कौतुक केले.

**श्री. रुपेश बंडू सर, अध्यक्ष, शिवजन युवामंच, तालुका दौंड**

मुलांच्यात झालेली प्रगती बघायला मिळाली, असे आत्तापर्यंत कुठेही पाहिले नाही. शिक्षिकांचे कौतुक केले. सरांचे कार्य महान आहे. माझ्याकडून जेवढे शक्य होईल तेवढे मी सहकार्य नक्कीच करायला तयार आहे. आपल्या संस्थेला शुभेच्छा दिल्या. संपूर्ण टीमचे कौतुक केले.

**शीतल जोगावडे**
विशेष शिक्षिका, स्वरनाद, दौंड

◆◆◆

## Success Story of our Child..

Debyanshu Bera, a 7-year-old boy, joined the Swaranaad Rehabilitation Centre on February 27, 2024, after getting bilateral cochlear implants in January 2024. He had been identified with hearing loss at 1.5 years old, but due to the COVID-19 pandemic, he missed out on speech therapy while using hearing aids. When he first came to Swaranaad, he couldn't recognize the six basic sounds and wasn't speaking at all. He was also very hyperactive and had trouble sitting still.

With the combined efforts of his mother and his special educator, Debyanshu gradually started improving. The educator introduced him to the six basic sounds through different techniques, and over time, he began responding to both loud and soft sounds. His mother reinforced these exercises at home, helping him practice.

Soon, Debyanshu was able to recognize his name, his classmates' names, and speak simple words, like the names of fruits and vegetables. His cognitive skills also improved, as he started remembering details about daily activities, like what he ate or what he did during the day.

In reading sessions, Debyanshu learned to read basic Hindi letters and sounds (Swar, Vyanjan, Barakhadi) and was able to write them too. He made progress in listening to words and identifying them in dictation exercises, showing how much his listening and thinking skills had improved.

Additionally, he began identifying days and dates, and his understanding of language grew overall. His transformation from not recognizing sounds to being able to read and write shows the positive impact of the teamwork between his mother and his educator, proving that with proper support, significant progress can be made in a child's development.

**Jyoti Ranpura**
Special Educator,
Swaranaad – Kothrud.

◆◆◆

## SWARANAAD REHABILITATION CENTER
## Monthly Achievement - September 2024

| Sr. No. | FACILITIES | SESSION / STUDENT COUNT |
|---|---|---|
| 1. | Speech Therapy Sessions | 190 |
| 2. | No. of Student getting Speech Therapy | 75 |
| 3. | Aided Audiogram Testing | 24 |
| 4. | No. of Speech Assessment | 5 |
| 5. | No. of Counselling Sessions | 9 |
| 6. | Individual Occupation Therapy Sessions | 8 |
| 7. | No. of students getting Individual OT | 50 |
| 8. | Group Occupational Therapy Sessions | 43 |
| 9. | Psychological Assessment | 8 |
| 10. | Activity Therapies | 38 |

## SWARANAAD OUTREACH CENTER
## Monthly Achievement - September 2024

| Sr. No. | CENTERS | THERAPY SESSION |
|---|---|---|
| 1. | Khed | 34 |
| 2. | Narayangoan | 68 |
| 3. | Pimpari | 38 |
| 4. | Chinchwad | 35 |
| 5. | Phonda | 22 |
| 6. | Porvorim | 60 |
| 7. | Manchar | 81 |
| 8. | Daund | 6 |
| 9. | Urawade (Residential) | 36 |
| 10. | Kudal | 7 |

COCHLEA WARTA कॉक्लिआ वार्ता

# होय! प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल..

## कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग ॲण्ड स्पीच
### स्वरनाद कर्णबधिर बालकांचे पुनर्वसन केंद्र

## निवासी केंद्राची वैशिष्ट्ये

**प्रवेश चालू २०२४-२५**

१. २५ कर्णबधिर मुले आणि त्यांची माता यांची निवास व्यवस्था
२. दृश्य आणि क्रियाकलाब आधारित
३. शिक्षणावर विशेष भर देऊन पूर्व प्राथमिक शिक्षण
४. जवळपासच्या गावातील कर्णबधिर मुलांसाठी बालवाडी
५. भोजन व्यवस्था दालन – ५० जणांसाठी
६. लवकर निदान आणि हस्तक्षेप
७. बालक पालक कार्यक्रम
८. वाचा भाषा प्रशिक्षण (० ते ६) वयोगटातील मुले
९. नियमित वाचा भाषा विकास मूल्यांकन श्रवण तज्ज्ञांकडून श्रवण चाचणी
१०. पालक प्रशिक्षण कर्णबधिर मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या मातांना सक्षम करणे.
११. विशेष शिक्षकांचे प्रशिक्षण

: संपर्कासाठी :

**9923289844 / 9822094940**

HTTPS://COCHLEASWARANAAD.ORG/

पुसाळकर स्वरनाद माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र
उरवडे, तालुका मुळशी, जि. पुणे.

# संस्थेची केंद्र

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे – ४११ ०३८.
**संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४**
**अभिलाषा अग्निहोत्री ९३७१४२०९९४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,
पिंपरी–चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.
शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव,
पुणे – ४११ ०३३. **फोन : ९८२२६७१८४०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
डॉ. खडके गेस्ट हाऊस,
राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड, पुणे.
**फोन : ९८५०७३८२७६**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
डॉ. खैर जीवन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल,
नारायणगाव जुन्नर रोड, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी–गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा – ४०३ ५२१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, सांचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व–प्राथमिक विद्यालय**
एफ–४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
फौंडा, गोवा – ४०२ ४०१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी–चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी.
**फोन : ८०८७२२९९५४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
'सी' विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
**फोन : ७०४०६६८०७१/८६६८८३१२११**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**फोन : ८४५९०१९६०२**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
**फोन : ९४०५९९८९८९**

**'पुसाळकर स्वरनाद' माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
माँटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे – ४१२ ११५.
**फोन : ८३०८८३२१४५**

# जागतिक कर्णबधिरत्व दिन
# जनजागृति फेरी व स्पर्धा












## निबंध लेखन स्पर्धा





## पोस्टर मेकिंग स्पर्धा



RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015
Registration No. : PCW/195/2023-25

Published and Posted on 10th OCTOBER 2024
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.

# स्नेह संमेलन दौंड केंद्र

















**Address :**

**To,**